नियमीत फौजदारी केस क्र.०१/२०२६
सरकार (महा.शासन)
-वि-
विष्णु बांदेकर +०१

नि. क्र.२२ लगत

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र०१ चा पुढील सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.जी.आर. माजगावकर यांचे मार्फत -**

०२. काढलेल्या प्रिंटा दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला फेरिस्ट नि.क्र.५२ सोबत असलेल्या सोळा प्रिंटा दाखवल्या. त्यावर माझी आणि दुसरे पंच मठकर यांची सही आहे. पोलीसांनी आमच्या समक्ष प्रिंटा जप्तीचा पंचनामा केला. सदरचा पंचनामा मला दाखवला. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माइ-या व मठकर यांच्या सह्या आहेत. सदरचा पंचनामा **नि.पी-१/पीडब्ल्यु-१** कडे आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी क्र.०१ तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्रीमती आर.डी.लोखंडे यांचे मार्फत-**

०३. मी सावंतवाडी येथील लक्ष्मीनगर येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मी रघुनाथ सावे यांचा जावई आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मोबाईल, संगणक किंवा फोटो काढण्यासाठीचा विशेष डिप्लोमा केलेला नाही. पंचनामा करण्यापुर्वी पोलीसांनी मला नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी घरी होतो. घरापासुन पोलीस स्टेशनला जायला मला पाच ते दहा मिनीटे लागली. पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी मला लेखी नोटीस दिली नव्हती. पंचनामा करण्यासाठी पोलीस ठाण्यातील किती नंबरच्या दालनात मी होतो, हे मला आता आठवत नाही. स्क्रीन शॉट काढण्यापुर्वी मी तो गुगल कंपनीचा मोबाईल तपासुन पाहिला होता. सदर मोबाईलचा रॅम (RAM) व रोम (ROM) मी सांगु शकत नाही.

प्रश्न :- तुम्हाला त्या मोबाईलचा रॅम, रोम, स्टोरेज व आय.एम.ई.आय.नंबर माहिती नाही ?

उत्तर :- मला फक्त आय.एम.ई.आय.नंबर माहिती आहे.

साक्षीदार पुन्हा सांगतात की, प्रत्येक फोनला आय.एम.ई.आय.नंबर असतो, पण

या फोनचा मला माहिती नाही.

**०४.** आय.एम.ई.आय.नंबर किती अंकी असतो, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या प्रिंटरमधुन प्रिंटा काढल्या त्या प्रिंटरची कंपनी व त्याचे Configuration मी सांगु शकत नाही. हॅश व्हॅल्यु काय असते हे मला माहिती नाही. स्क्रीन शॉट काढल्यानंतर त्याची हॅश व्हॅल्यु काढली होती किंवा कसे, हे मला माहिती नाही. प्रिंटा काढल्यानंतर त्याची हॅश व्हॅल्यु काढली होती किवा कसे, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या गुगल पिक्सल ६ए मोबाईलवरून स्क्रीन शॉट काढले त्या मोबाईलच्या मालकी संदर्भातील कागदपत्रे फिर्यादीने माइ-या समक्ष पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील मजकुर कसा लिहीतात, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगीतले आणि पोलीसांनी ते लिहुन काढले असे घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा पोलीसांनी लिहला मी तो वाचला व त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, कथीत पंचनाम्यासाठी मी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, दुसरे पंच माइ-या व फिर्यादीच्या चांगल्या परिचयाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दुसरे पंच रमेश मठकर हे फिर्यादी राहतात त्या बिल्डींगमध्ये राहण्यास आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माइ-या समक्ष कोणतेही स्क्रीन शॉट काढले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माइ-या सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सास-यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र.०१ तर्फे विधीज्ञांनी घेतलेला उलटतपास आरोपी क्र.०२ तर्फे वकील श्री. डी.व्ही.माणगावकर यांनी अंगिकारला -**

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास – नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONIAJYOTI AJIT KANSHIDE
Date: 2026.06.13 18:37:21 +0530

ठिकाण :- ओरोस
दिनांक :- १९/०६/२०२६.

**( ...ए.कानशिडे )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग-ओरोस.